दैनिक,पुढारी,सातारा,शुक्रवार,दि.23नोव्हेंबर2012,पान.क्र.3.

# शिवकृपा पतपेढीचा आज वर्धापनदिन

**कोरेगाव : प्रतिनिधी**

शिवकृपा सहकारी पतपेढीचा दि. २२ नोव्हेंबर रोजी ३० वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अविनाश भोसले यांनी दिली.





१९८२ साली स्थापन झालेल्या या संस्थेची यशोगाथा फिनिक्स पक्षाप्रमाणे असून संस्थेची वाटचाल आता सहकारातील दिपस्तंभ म्हणून गौरवशाली बनली आहे. संस्थेच्या प्रगतीत अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी यांच्यासह सर्व आजी माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी, ठेवसंकलनप्रतिनिधी, सभासद, ठेवीदार, हितचिंतक, कर्जदार यांचे योगदान आहे .संस्थेच्या महाराष्ट्रात ६३ शाखा व ५ विभागीय कार्यालये असून या माध्यमातून संस्थेचा व्यवसाय रु. १२८५ कोटींचा आहे. ठेवी रु. ७०७ कोटीच्या आहेत. संस्थेचा मार्च २०१२ अखेर ढोबळ नफा रु. ६ कोटी आहे. येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण १.१७% इतके आहे.

संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात संस्थेच्या शाखांची संख्या शतकपूर्तीकडे नेण्याचा मनोदय व्यक्त केला.संस्थेला विविध संस्था व सहकार खात्यामार्फत विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

संस्थेच्या ६३ शाखांचा विस्तार असून त्यापैकी ३१ कार्यालये स्वमालकीच्या जागेत कार्यरत आहेत. सर्व शाखा सुसज्ज, वातानुकूलीत व संगणकीकृत असून सर्व शाखांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय कार्यालय, मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, कोरेगाव अशी ५ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.संस्थेच्या वाटचालीमध्ये संचालक सखाराम संकपाळ, वसंतराव चव्हाण, भिमराव बोराडे, सोपान बोराडे, बाळासाहेब मोहिते, जयवंत खामकर, अशोक तुपे, बबन काटे, अशोक शिंदे, शिवाजी वरुडे, ॲड. अशोक शिंदे, संचालिका निर्मला ऐवळे, उषा जाधव, कर्मचारी प्रतिनिधी सुनील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे, अधिकारी, कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचे भरीव योगदान आहे.

# मौलाना आझाद जयंती साजरी

**सातारा : प्रतिनिधी** मौलाना अबुल कलाम आझाद यांची १२५ वी जयंती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे साजरी करण्यात आली. मौलाना आझाद यांनी देशासाठी केलेले बलिदान व्यर्थ जावू देवू नका, त्यांचे विचार देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवा, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड यांनी केले. याप्रसंगी नवनिर्वाचित कृषि राज्य केंद्रीय मंत्री ना. तारीक अन्वर यांचा सत्कार सातारा जिल्हा राष्ट्रवादी अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष शफीक शेख यांनी केला. अल्पसंख्याक सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी ही विनंती केली. जातीचा दाखल्यासंदर्भात व महिला बचतगट संदर्भात निवेदन देण्यात आले. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष हबीब फकीह, चंद्रकांत जाधव, तालुकाध्यक्ष सिकंदर डांगे, अहद पठाण, सलीम काझी, जावेत्त आतार, सलीम खान, रशीद शेख, आयुब मोकाशी, रिजवान भाई उपस्थित होते.